जा. क्र. कृसंकें/निजसालिप्र/ 87/२०१८.
कृषि संशोधन केंद्र, रेपोली
ता. माणगांव, जि. रायगड,
दिनांक. 24 JAN 2018

प्रति,

**मा. विस्तार शिक्षण संचालक,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
ता. दापोली, जि. रत्नागिरी

विषय :— :— निरुपयोगी जडवस्तू साहित्य लिलाव प्रक्रियेसाठी जाहिरातीच्या मसुदयास व प्रसिध्द करण्यास विद्यापीठ वेब साईडवर प्रकाशित करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविणेत येते की, कृषि संशोधन केंद्र, रेपोली या संशोधन केंद्रातील निरुपयोगी जडवस्तू साहित्याचा लिलाव दरपत्रक बंद लिफाफा मागणी पध्दतीने करण्यासाठी विद्यापीठ वेब साईडवर प्रकाशित करण्याकरीत अटी व शर्ती सोवत जोडून पाठविण्यात येत आहे.

सदर बाब माहितीसाठी सविनय सादर.

आपला विश्वासू,

सेबत :— वरील प्रमाणे.

**प्रभारी अधिकारी,**
कृषि संशोधन केंद्र, रेपोली,
ता. माणगांव, जि. रायगड.

Scanned by CamScanner

# लिलाव

''डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत, कृषि संशोधन केंद्र, रेपोली, पो. उसरघर, ता. माणगांव, जि. रायगड यांचे कार्यालयातील निरुपयोगी जडवस्तू साहित्य विक्री करीता उपलब्ध असून सदर निरुपयोगी जडवस्तू साहित्याची पहाणी दि. २९/०१/२०१८ ते दि. १७/०२/२०१८ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ८.०० ते १२ व दुपारी २.०० ते ५.०० या वेळेमध्ये (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळुन) करता येईल. लिलावासंबंधीच्या अटी व शर्ती मा. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, रेपोली, ता. माणगांव, जि. रायगड यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र, रेपोली
ता. माणगाव जि. रायगड

Scanned by CamScanner

कृषि संशोधन केंद्र, रेपोली या संशोधन केंद्रातील निरुपयोगी जडवस्तू साहित्याचा लिलाव करण्यासाठी दरपत्रक बंद लिफाफा मागणी पध्दतीने लिलाव करण्यासाठी खरेदीदारांसाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१ निरुपयोगी जडवस्तू साहित्याचा पहाणी खरेदीदारांना कार्यालयीन कामकाजच्या दिवशी सकाळी ८ ते १२ व दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये करता येईल. (कार्यालयीन सुटटीचे दिवस वगळुन)

२ खरेदीदारांनी निरुपयोगी जडवस्तू साहित्याची अपेक्षित किंमत बंद लिफाफ्यात कार्यालयामध्ये ठेवलेल्या बंद पेटीमध्ये दि. ०३/०३/२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत (स. ०८.०० ते ०५. ४५) टाकावी.

३ खरेदीदारांनी निरुपयोगी जडवस्तू साहित्य लिलावात सहभाग घेण्यासाठी असलेल्या रु. ५०००/— या अनामत रक्कमेचा भरणा लिफाफा बंद पेटीमध्ये टाकण्यापूर्वी कार्यालयात जमा करावा. ज्या खरेदीदारांनी अनामत रक्कमेचा भरणा कार्यालयात केला नसेल त्यांना लिलावामध्ये सहभाग घेता येणार नाही.

४ निरुपयोगी जडवस्तू साहित्याच्या लिलाव प्रक्रियेत जर खरेदीदारांची बंद लिफाफ्या मध्ये नमूद केलेली किंमत जर ठरविलेल्या हातच्या मूल्या पेक्षा कमी असेल तर त्याच वेळी व ठिकाणी उघड बोली पध्दतीने प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. या प्रक्रियेत ज्या खरेदीदारांनी बंद लिफाफ्या द्वारे किंमत कळविली असेल त्याच. खरेदीदारांना लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल. या नंतरही हातच्या मूल्यापेक्षा कमी रक्कमेची बोली लावली गेल्यास लिलाव प्रक्रिया रद्द करणेत येईल.

५ निरुपयोगी जडवस्तू साहित्य उचल करण्यासाठी दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदारास जडवस्तू साहित्याच्या एकूण लिलाव रक्कमेच्या ५०% रक्कम लिलावाच्या दिवशी भरणे बंधन कारक असेल. उर्वरीत लिलाव रक्कमेचा भरणा आणि तसेच लिलाव साहित्याची उचल लिलावानंतर २ ते ३ दिवसात करणे बंधनकारक राहिल.

६ निरुपयोगी जडवस्तू साहित्य उचल करण्यासाठी मंजूर केलेल्या ठेकेदाराने. सदर साहित्याची उचल करताना प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

७ लिलाव प्रक्रिया पुढे ढकलणे अथवा रदद करणे बाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, निरुपयोगी जडवस्तू साहित्य लिलाव समितीनी राखून ठेवत आहेत.

८ बंद लिफाफ्यावरती ''निरुपयोगी जडवस्तू साहित्य लिलाव'' असे नमूद करावे.

९ दिनांक ०७/०३/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता खरेदीदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर निरुपयोगी जडवस्तू साहित्याचा लिलावासंबंधी दरपत्रके उघडण्यात येतील.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र, रेपोली
ता. माणगाव जि. रायगड

Scanned by CamScanner